# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७

E-mail : desk18@ dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**Web Notification**

का.क्र. :१८/तंशिसं/संस्था-पत्र/२०१८/१०
दिनांक :- ०५/०१/२०१८

प्रति,

संबंधित प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
पदविका संस्था व त्यामध्ये शिक्षण घेणारे अल्पसंख्यांक विद्यार्थी

विषय :- केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी **पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचा** लाभ प्राप्त केलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी सूचना...

संदर्भ : उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे दि.०५/०१/२०१८ रोजी ईमेलद्वारे प्राप्त परिपत्रक क्र. उशिसं/शिष्य/अल्पसंख्यांक/१७-१८/१६६ दि.०४/०१/२०१८

या संचालनालयाच्या अधिनस्थ सर्व संबंधित पदविका संस्थांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या सोबत जोडलेल्या संदर्भीय परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक तथा नोडल अधिकारी
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई.

प्रत –

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४था मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,७वा मजला,मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे,नाशिक, नागपूर,औरंगाबाद,अमरावती यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

४) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे–०१ यांना माहितीसाठी.

महाराष्ट्र शासन
संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in
E-mail: scholarshiphd2@gmail.com
Phone no. 020/26126939
Fax no.020/26111153

क्र. उशिसं/शिष्य/अल्पसंख्याक/१७-१८/ ५६६.
दिनांक 24 JAN 2018

परिपत्रक

विषय – केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त केलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी सूचना...

संदर्भ- भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ मायनॉरिटी अफेअर्स (स्कॉलरशिप डीव्हीजन), नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ५-४/२०१६-एसएस, दि. ०५/०४/२०१७.

भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ मायनॉरिटी अफेअर्स (स्कॉलरशिप डीव्हीजन), नवी दिल्ली यांचे वरील संदर्भिय पत्रास अनुसरुन अकरावी / बारावी (कला/वाणिज्य/विज्ञान) व वरिष्ठ महाविद्यालयातील (कला/वाणिज्य/विज्ञान) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम / एम.फील / पीएच.डी. अभ्यासक्रम / व्यावसायिक (डी. एड्., बी. एड्., एम.एड्., बी.पीएड., एम.पीएड., विधी, आय. टी. आय.), सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम. सी. व्ही. सी. अभ्यासक्रम, तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व अभ्यासक्रम चालविणाऱ्या पात्र संस्था / महाविद्यालय / विद्यापीठात प्रवेश घेतलेले व केंद्र शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त केलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, मंजूर शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी संस्था / महाविद्यालय/ विद्यापीठ यांचे प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्काची न भरलेली रक्कम संबंधीत संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांचेकडे १५ दिवसांच्या आत जमा करावी अन्यथा पुढील वर्षी त्यांचे शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठीचे अर्ज संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांचेकडून स्विकारण्यात येणार नाहीत.

तसेच उपरोक्त सर्व अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यामध्ये प्रवेशित व सदर अभ्यासक्रमास शिकणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेची रक्कम बँक खात्यात प्राप्त झाल्यानंतरही संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांची प्रवेश व शिक्षण शुल्काची रक्कम भरली नाही अशा विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक वर्षामध्ये ऑनलाईन शिष्यवृत्तीचे नूतनीकरणाचे अर्ज संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांनी छाननी करुन मंजूरी व पुढील कार्यवाहीसाठी पाठवू नयेत व याबाबतच्या सर्व सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

सदर योजना ही केंद्रशासन पुरस्कृत असल्याने केंद्रशासनाकडून दि. ०५/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार सदर सूचना देण्यात येत आहेत.

सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(डॉ. धनराज माने)
नोडल ऑफीसर तथा शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सचिव, अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, नवी दिल्ली.
३. मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. मा. सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

८. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.
९. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई ४०० ००१.
१०. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.
११. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे
१२. मा. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे
१३. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग
१४. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.
१५. कुलसचिव, महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ, फुटाला लेक, नागपूर ४४० ००१.
१६. कुलसचिव, सर्व कृषि/अकृषि/अभिमत विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य
१७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१८. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प.

२/- सदरचे परिपत्रक आपले संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या अधिनस्त संबंधीत संस्था / विद्यापीठे / महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात.

१९. केंद्रशासनाच्या अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजने अंतर्गत येणारे सर्व (शासकीय / अशासकीय/ अनुदानित / विनाअनुदानित / कायमविनाअनुदानित) कनिष्ठ / वरिष्ठ / व्यावसायीक संस्था / महाविद्यालये / विद्यापीठ यांनी सदर परिपत्रक त्यांच्या संकेतस्थळ / नोटीस बोर्ड येथे प्रसिध्द करावे. तसेच संबंधित विद्यार्थ्यांना पत्र / दुरध्वनी / एस.एम.एस. द्वारे सूचना देण्यात याव्यात.